राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक २०१०/४८९७/०२६

श्री. किशोर बापूराव ढाकणे,
सहकारी स्टे.ऑफ.हौ.सो.
बि.नं.सी-२,रुम नं.२:३, सेक्टर ८ब,
सी.बी.डी.बेलापूर,नवी मुंबई-४००६१४. ...अपीलकार

म. प्र. नि. मंडळ
आवक विभाग
आवक क्र. 100623
दिनांक........

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वरिष्ठ विधी अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, २/३/४ था माळा, सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन(पूर्व), मुंबई-४०००२२.

जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, २/३/४ था माळा, सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन(पूर्व), मुंबई-४०००२२. ...उत्तरवादी

विवेचन

अपीलकार श्री. किशोर ढाकणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.३.२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.७.१२.०९ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवर कंत्राटी कनिष्ठ संशोधक यांच्या पुनर्नियुक्तीसाठी सचिव,पर्यावरण विभाग अथवा अध्यक्ष यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि.१७.९.०८ च्या कार्यालयीन टिप्पणीची छायाप्रत,लक्षवेधी सूचनेच्या आश्वासनपूर्तीच्या अहवालाची प्रत इत्यादी सेवाविषयक बाबींसंबंधी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी आवश्यक ती माहिती विहित कालावधीत पुरविली नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपीलीय अधिका-याकडे दि.७.१.०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलका...

50

PIO
Shri Bhure

अर्जातील मुद्दा क्र.३ व ४ बाबत माहिती पुरवण्याबाबत दि.२०.१.०१० रोजी आदेश पारित केले. अपूर्ण, चुकीची माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक २०.५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन सेवाविषयक बाबीसंबंधी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन असे प्रतिपादन केले की, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली आहे. अपीलावरील सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी वस्तुस्थिती,वास्तविकता सादर केली. यावरुन असे उघड होते की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. परंतु यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. माहितीच्या अधिकारानुसार अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली किंवा नाही याबाबत माहितीच्या अधिकारात खात्री करण्यात येते. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक: ३१.५.२०१०

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई

State Information Commission, Greater Mumbai